MHPU080012082026

<u>फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७३ चा अधिनियम) प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेला २०२६ चा संक्षिप्त खटला क्र. ८०७ याचा अभिलेख</u>

<u>नि.क्र. ३</u>

| | | |
|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक व वेळ | – २८/०७/२०२६ |
| २) | अहवालाचा/फिर्याद दिनांक | – २८/०७/२०२६ |
| ३) | फिर्यादीचे नांव व पत्ता | – महाराष्ट्र शासन मार्फत विश्रांतवाडी पोलीस स्टेशन |
| ४) | आरोपीचे नांव, वय व पत्ता | – ईस्माईल अहमद शेख<br>वय – ३७ वर्षे,<br>रा. स.नं. ११०/१११, टँक रोड, ११ स्टार मित्रमंडळाजवळ, शांतीनगर, येरवडा, पुणे. |
| ५ (अ) | ज्याबद्दल खबर दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | – |

असा आरोप ठेवतो की, तुम्ही दिनांक २८/०७/२०२६ रोजी सांयकाळी १६.१५ वाजता विनोद मेमोरियल हॉस्पीटल समोर, विश्रांतवाडी, पुणे येथे तुमचे ताब्यातील भाजीपाला विक्रीचा ठेला लोकांना अटकाव होउन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना चालण्यास अडथळा निर्माण होईल व वाहन चालकाच्या जिवीतास धोका निर्माण केला म्हणून तुमच्यावर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

आरोपाचे तपशील आरोपीला वाचून दाखविले.

MAIMUNA SULTANA MOINUDDIN

Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.08.03 16:47:17 +0530

(मैमुना सुल्ताना एम.)

दिनांक – ०३/०८/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी

आरोपीची जबानी

प्रश्न १ – दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न २ – तुमच्या विरुध्द ठेवलेले आरोप तुम्हाला समजले काय ?

उत्तर – होय.

प्रश्न ३ – तुमच्यावर ठेवलेले आरोप तुम्हाला कबूल आहे काय ?

उत्तर – होय.

MAIMUNA SULTANA MOINUDDIN

Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.08.03 16:47:22 +0530

(मैमुना सुल्ताना एम.)

दिनांक – ०३/०८/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी, पुणे.

------------

आरोपीची सही.

**न्यायनिर्णय**

आरोपीला गुन्ह्याचा तपशील मराठी भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने माझे समोर स्वेच्छेने त्याचेवरील गुन्हा मान्य केला तसेच निशाणी ४ प्रमाणे गुन्हा कबूलीची पुरसीस अभिलेखावर दाखल केली. आरोपीने गुन्ह्याची दिलेली कबुली ही ऐच्छिक आहे याबद्दल खात्री पटल्यानंतर, मी त्याला भारतीय न्याय संहितेचे

कलम २८५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवले.

आरोपीने तो त्याच्या कुटूंबातील एकमेव कमावणारा सदस्य असल्याने त्याच्यावर दया दाखवण्यात यावी व कमीत कमी दंड आकारण्यात यावा अशी विनंती केली. गुन्ह्याचे स्वरूप, आरोपीने दिलेली गुन्ह्याची कबुली आणि त्याची विनंती विचारात घेता, खालील प्रमाणे आदेश न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरेल.

**आदेश**

१) आरोपी ईस्माईल अहमद शेख यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात येत आहे.

२) आरोपीस र.रु. २,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार फक्त) द्रव्य दंडाची शिक्षा, दंड न भरल्यास पाच दिवसांची साधा कारावास ऐवढी शिक्षा सुनावण्यात येते.

MAIMUNA SULTANA MOINUDDIN

Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.08.03 16:47:28 +0530

(मैमुना सुल्ताना एम.)

दिनांक – ०३/०८/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी, पुणे.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर मूळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | योगेश के. कोटस्थाने |
| न्यायालयाचे नाव | – | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, खडकी, पुणे |
| आदेश/न्यायनिर्णय जाहीर केलेची दिनांक | – | ०३/०८/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ०३/०८/२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | ०३/०८/२०२६ |

SCC No. 807/2026
State Vs. Ismail
Under Section 285 of BNS.

**ORDER PASSED BELOW REMAND APPLICATION OF ACCUSED**
**(Dated 03/08/2026)**

The accused is produced before me today at 04.45 p.m. alongwith chargesheet. The accused is represented by an advocate. I heard the accused and his counsel. There is no ill-treatment complaint at the hands of police. The accused is taken into MCR till 14/08/2026.

MAIMUNA SULTANA MOINUDDIN

Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.08.03 16:47:36 +0530

Date : 03/08/2026

(Maimuna Sultana M.)
Judicial Magistrate First Class,
Khadki, Pune.